# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष,
दुसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज भवन.
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी,
मुंबई ४०० ०९८.

क्र.परीक्षा/परीक्षा अर्ज/निकाल कक्ष/४३६/२०२३, दि. १२ डिसेंबर, २०२३.

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम—२०१६** च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही अमुलाग्र बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार शैक्षणिक वर्षे २०२३—२४ मधील **हिवाळी—२०२३ (व्दितीय सत्र)—२०२३** मध्ये होणाऱ्या **पदव्युत्तर (PG) (NEP 2020)** परीक्षांचे परीक्षा प्रवेश अर्ज विहीत फीसह **E-Samarth** या अभिकरणामार्फत Online घेण्यात येणार आहेत.

सदर अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज E-Samarth वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालील प्रमाणे आहे:—

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारीख | विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | १३/१२/२०२३ ते २१/१२/२०२३ | २३/१२/२०२३ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत) |

तरी वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम/सत्र निहाय परीक्षा प्रवेश अर्ज परीक्षा अर्ज भरून घेण्यापासून ते परीक्षा शुल्क भरण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया **E-Samarth** वर पूर्ण करून त्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तपशीलाची प्रत (Exam Form Submission Report) व परीक्षा शुल्क भरल्याची पावती परीक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करण्यात यावी. **पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही.**

**परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता (२१/१२/२०२३ रोजी) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम, परीक्षा केंद्र, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापरण्यात येणार आहे. **परीक्षा अर्ज Inward झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.**



Scanned with OKEN Scanner
CamScanner

परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांच्या Login मधून परीक्षेचे विषय बदल करता येतील. परीक्षा अर्ज Inward झाल्यानंतर परीक्षेच्या विषयामध्ये बदल करायचा असल्यास प्रती विषय ५० रू. प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विनंती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थळ : मुंबई.
दि. : १२ डिसेंबर, २०२३.

(डॉ. प्रसाद कारंडे)
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव

अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
३. उपकुलसचिव(नावनोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई—०९८.
४. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई—०९८.
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
६. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
७. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
८. समन्वयक, E-Samarth परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०३२.
२. उपकुलसचिव (जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
३. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०३२.
४. प्र. कुलगुरू/कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी/संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

(डॉ. प्रसाद कारंडे)
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Scanned with OKEN Scanner
CamScanner